# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- ०४/०३/२०१८

## असरअली संघाने जिंकला बिरसा मुंडा व्हॉलीबॉल चषक

गेल्या एक महिन्यापासून अतिशय रंगतदार सामन्यांनी गाजलेला बिरसा मुंडा व्हॉलीबॉल चषक आज असरअली संघ, उपविभाग सिरोंचा यांनी जिंकला. काल रात्री पोलीस मुख्यालय गडचिरोली येथे असरअली संघ आणि अहेरी संघ यांच्यात झालेला अंतिम सामना अत्यंत चुरशीने खेळला गेला तब्बल १ तास ४० मि. रंगलेल्या या सामन्यात पहिला सेट मध्ये सिरोंचा संघाला २५-२३ असा निसटता विजय मिळाला. दुसरा सेट मध्ये जोरदार प्रतिहल्ला करुन अहेरी संघाने सिरोंचा संघावर २५-१४ या अंतराने जिंकत आपले आव्हान कायम केले. तिसऱ्या व निर्णायक सेट मध्ये मात्र सिरोंचा संघाने अहेरी संघावर जोरदार हल्ला चढवत १५-१० गुण मिळवून बिरसा मुंडा चषकावर आपले नाव कोरले तर अहेरी संघाला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले. तिसऱ्या स्थानासाठी उपविभाग गडचिरोली आणि उपविभाग जिमलगट्टा या दोन संघामध्ये लढत होऊन उपविभाग गडचिरोली संघाने बाजी मारली.

अजिंक्य ठरलेल्या असरअली संघास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रूपये २५००० रोख आणि बिरसा मुंडा चषक बिरसामुंडा यांचे नातु सुखराम मुंडा व बुधराम मुंडा यांच्या हस्ते प्रधान करण्यात आले. उपविजेता संघास रूपये २००० रोख व चषक मा. प्रभारी पोलीस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी सो. यांच्या हस्ते देण्यात आले तर गडचिरोली उपविभागास तृतीय क्रमांकाचे १५००० रोख व चषक मा. अपर पोलीस अधिक्षक डॉ. हरी बालाजी सो. यांच्या हस्ते देण्यात आले.

२६ जानेवारी २०१८ पासून खेळल्या गेलेल्या व अत्यंत यशस्वी ठरलेल्या या स्पर्धेत तब्बल ७५८ संघानी तसेच ९०९६ खेळाडूंनी भाग घेतला होता. संपुर्ण स्पर्धा अतिशय चुरशीने खेळली गेली दुर्गम व अतिदुर्गम भागातील तरूणांच्या कलागुणांना वाव मिळावा व गडचिरोलीतून भविष्यातील मोठे खेळाडु निर्माण व्हावे यासाठी मा. पोलीस अधिक्षक डॉ. अभिनव देशमुख सो. यांच्या संकल्पनेतून या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.